MHPU120001982024

**नियमित दिवाणी दावा क्र.४७/२०२४**

**निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश**

(सोपान डेरे विरूद्ध दिपक तुकाराम डेरे व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये. तसेच ७/१२ सदरी झालेल्या नोंदीचा गैरफायदा घेवून दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करु नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे.

**०२. दावा मिळकतीचे वर्णन :–**

मौजे रायरी, ता.भोर जि.पुणे येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती या वादी यांच्या मालकीच्या आहेत.

| अ.क्र. | गट नंबर | सर्वे नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १. | ४४/२अ | ४४/२ पो | ०५.९० आर | ०.४१ पैसे |
| २. | ४४/३अ | ४४/३ पो | ०३.३० आर | ०.३३ पैसे |
| ३. | ४४/४ | ४४/१फा | ००.०७ आर | ०.०३ पैसे |

**(येणेप्रमाणे उपरोक्त वाद मिळकतीस यापुढे सोईकरीता "दावा मिळकत" असे संबोधण्यात येईल )**

**०३.** वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे वडील गेणू उर्फ गेणबा बाबू डेरे यांच्या मालकीची आहे. सदर दावा मिळकत ही गेणू डेरे यांना त्यांच्या लग्नामध्ये आंदन म्हणून देण्यात आलेली होती. त्यानंतर त्यांच्या मालकी व ताबे वहिवाटीप्रमाणे दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी फेरफार क्र.४४ अन्वये त्यांच्या नावाची नोंद करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे सदर गेणू डेरे हे त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होते. सदर गेणू डेरे यांच्या मृत्युनंतर फेरफार क्र.७९५ अन्वये वादी व

प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्या नावाची महसूल दप्तरी नोंद करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे वादी व प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणाचाही दावा मिळकतीत कोणत्याही स्वरुपाचा कायदेशीर हक्क व हितसंबंध नाही.

**०४.** दावा मिळकतीपैकी सर्वे नं.४४/२ चे क्षेत्र ०३ आर व सर्वे नं.४४/३ चे क्षेत्र ०५ आर हे सन १९९७–९८ मध्ये निरा– देवघर धरणाकरीता संपादित करण्यात आलेले आहे. सदर संपादित क्षेत्राचा मोबदलादेखील वादी यांचे पूर्वहक्कदार गेणू डेरे यांनाच मिळालेला आहे. त्याचप्रमाणे सदर संपादित झालेल्या क्षेत्राचा मोबदला म्हणून गेणू डेरे यांना दि.१६.१२.२००१ रोजी उपविभागीय अधिकारी फलटण यांच्या आदेशान्वये मौजे ढवळेवाडी, ता.फलटण जि.सातारा येथील गट नं.१०२/२ पैकी ०१ हे २० आर ही पर्यायी जमीन देण्यात आली होती. त्यानंतर गेणू डेरे यांच्या मृत्युपश्चात सदर जमीनीस देखील प्रस्तुत वादी व प्रतिवादी क्र.५ ते ७ यांच्या नावाची नोंद झालेली आहे.

**०५.** वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दि.०७.०६.२०२३ रोजी तहसीलदार फलटण, जि. सातारा यांच्याकडे गट क्र.१०२/२ पैकी या जमीन मिळकतीस त्यांच्या नावाची नोंद होण्याबाबत खोटा अर्ज दाखल केलेला आहे. त्याप्रमाणे वादी यांना दि.०७.०९.२०२३ रोजी मंडल अधिकारी, फलटण यांची नोटीस प्राप्त झालेली आहे. त्यानंतर वादी यांनी दावा मिळकतीचे ७/१२ उतारे व फेरफार काढले असता प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी महसूल खात्याशी हातमिळवणी करुन त्यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.६४९ द्वारा नोंदविल्याचे वादी यांच्या लक्षात आले. त्यानंतर वादी यांनी सदरील फेरफार मिळण्याकरीता अर्ज दाखल केला असता सदर फेरफार हा पोलीस स्टेशनला जमा करण्यात आल्याचे त्याला समजले. त्याबाबतचे पत्र देखील तहसीलदार,भोर यांनी वादी यांना दिलेले आहे. परंतु सदरील फेरफार हा पोलीस स्टेशनमध्ये देखील उपलब्ध नाही.

**०६.** वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ४ हे दावा मिळकत व संपादित झालेल्या क्षेत्राच्या मोबदल्यात मिळालेले क्षेत्र हडप करु पाहत आहे. त्यामुळे प्रतिवादी हे दावा मिळकतीतील वादीच्या कब्जेवहिवाटीस देखील हरकत अडथळा करीत आहेत. वादी यांनी प्रतिवादी यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रतिवादी हे काहीही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नाहीत. सबब, वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. परंतु दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी ७/१२ नोंदीच्या आधारे त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण केल्यास अथवा वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, प्रतिवादी यांना मनाई करण्याकरीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०७.** प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी नि.३० वर त्यांची संयुक्त कैफियत व म्हणणे दाखल करून अर्जास विरोध केलेला आहे. प्रतिवादी यांनी अर्जातील सर्व मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादी यांनी आवश्यक पक्षकारांना दाव्यामध्ये सामील केले नसल्यामुळे तसेच दाव्याची केलेली आकारणी ही देखील चुकीची असल्यामुळे सदरचा दावा हा फेटाळण्यास पात्र आहे. तसेच वादी यांनी आवश्यक बाबी न्यायालयापासून लपवून ठेवलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची नावे सन १९९०–९१ ते सन २०२३–२४ पर्यंतच्या ७/१२ उताऱ्यांवर दाखल आहेत. तसेच वादी हे संपादनाच्या मोबदल्यात मिळालेले क्षेत्र हे एकटे गिळंकृत करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे त्यांनी खोटया मजकूरावर प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

**०८.** प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची सामाईक जमीन आहे. त्यामुळे वादी यांचे वडील हे एकत्रीत कुटुंबात थोरले असल्यामुळे एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणून शासकीय कार्यालयातून मोबदला रक्कम व त्या अनुषंगाने इतर कामकाज देखील त्यांनी केलेले आहे. तसेच संपादनाच्या क्षेत्रामध्ये मिळालेली पर्यायी

जमीन ही गेणू भागू डेरे वगैरे यांना मिळालेली आहे. तसेच राजश्री तुकाराम डेरे व तारुबाई तुकाराम डेरे या मयत असल्याची बाब देखील वादी यांनी लपवून प्रस्तुतचा चुकीचा दावा दाखल केलेला आहे.

**०९.** प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाची मिळकत आहे. तसेच तिचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. परंतु वादी यांचे वडील गेनबा डेरे व प्रतिवादी यांचे वडील तुकाराम डेरे हे वारसहक्काने सदर जमीन वहिवाटून त्यामध्ये हंगामी पिके घेवून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे फेरफार क्र.६४९ हा सन १९९५–९६ मध्ये करण्यात आलेला आहे. तसेच निरा– देवघर प्रकल्पाकरीता संपादीत झालेले क्षेत्र हे सामाईकातील असून सदर बुडीत क्षेत्रातील खातेदारांची माहिती बघितली असता त्यामध्ये वादी यांचे वडील गेणू भागू डेरे, प्रतिवादी क्र.१ ते ४, तारुबाई डेरे व राजश्री डेरे यांची नावे दाखल असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे मौजे ढवळेवाडी येथील गट नं.१०२/२ ही जमीन देखील जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांच्या आदेशान्वये गेनू भागू डेरे वगैरे यांना देण्यात आलेली आहे. सदर आदेशाची नोंद फेरफार क्र.७६७ अन्वये दि.०६.१०.२०१० रोजी घेण्यात आलेली आहे. परंतु सदर फेरफाराचा अंमल हा संबंधित गट नंबरला देताना गाव कामगार तलाठी यांनी फक्त गेणू भागू डेरे इतकाच मजकूर लिहिलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांच्या पूर्वहक्कदारांची नोंद करण्यात आलेली नाही.

**१०.** प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे जमीन संपादनावेळी प्रतिवादी हे अज्ञान असल्याने वादी यांचे वडील गेणू डेरे हे एकत्र कुटुंबाचा कर्ता म्हणून सर्व कार्यालयात जावून सर्व कामे पाहत होते. त्यामुळे त्यांनी संपादनाबाबत प्रतिवादी यांची फसवणूक केलेली आहे. प्रतिवादी यांनी तहसिलदार, फलटण यांच्याकडे त्यांची नावे नोंद करण्याकरीता प्रकरण सादर केलेले आहे. सदर प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट आहे. सदर

जमीनीमध्ये प्रतिवादी यांचा हक्क डावलण्याच्या हेतूने वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. सबब, त्यांनी अर्ज व दावा नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**११.** अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवतात. त्यावर मी कारणांसहित उत्तरे यापुढे नमुद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी हे प्रथमदर्शनी केस त्यांच्या लाभात असल्याचे सिध्द करतात काय ? | **नकारार्थी** |
| २. | तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतात काय ? | **नकारार्थी** |
| ३. | सोयीस्करतेचा तुला वादी यांच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात काय ? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो.** |

**१२.** वादी व प्रतिवादींच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनाशी सुसंगत असा युक्तीवाद केलेला आहे. वादी यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पुष्टयर्थ खालील कागदपत्रांवर त्यांची भिस्त ठेवलेली आहे.

| अ. क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| १. | साक्षीदार बबन विठोबा किंद्रे यांचे शपथपत्र |
| २. | साक्षीदार नावजी गोविंद किंद्रे यांचे शपथपत्र |
| ३. | तहसीलदार कार्यालय, भोर यांनी फेरफार क्र.६४९ नक्कल देता येत नसल्याबद्दलचे दि.३१.१०.२०२३ रोजी दिलेले पत्र जा.क्र./अभि/९३११/२०२३ |
| ४. | तहसीलदार कार्यालय, भोर यांनी फेरफार क्र.६४९ ची आरटीएस फाईलची नक्कल देता येत नसल्याबद्दलचे |

| | |
|---|---|
| | दि.०६.१२.२०२३ रोजी दिलेले पत्र जा.क्र./ अभि/ ९८७८/ २०२३ |
| ५. | मौजे रायरी येथील सर्वे क्र.४४/१ चा गट क्र.४४/४ चे सन १९५२ ते आजपर्यंचा ७/१२ उताराची प्रत |
| ६. | मौजे रायरी येथील सर्वे क्र.४४/२ चा गट क्र.४४/२अ चे सन १९५२ ते आजपर्यंचा ७/१२ उताराची प्रत |
| ७. | मौजे रायरी येथील सर्वे क्र.४४/३ चा गट क्र.४४/३अ चे सन १९५२ ते आजपर्यंचा ७/१२ उताराची प्रत |
| ८. | मौजे रायरी येथील खाते क्र.३१२ चा सध्याचा ८ अ उतारा प्रत |
| ९. | मौजे रायरी येथील फेरफार क्र.४४व ७९५ ची प्रत |
| १०. | गेनू भागू डेरे यांच्या नावे आलेल्या भुसंपादनाच्या नोटीसा |
| ११. | मंडल अधिकारी फलटण यांनी दि.०७.०९.२०२३ रोजी दिलेली नोटीस |
| १२. | प्रतिवादी क्र.१ यांनी वादी व इतर यांच्या विरोधात तहसीलदार फलटण यांच्याकडे दाखल केलेल्या अर्जाची प्रत |
| १३. | वादी यांनी उपविभागीय अधिकारी, भोर यांच्याकडे फेरफार क्र.६४९ विरुध्द दाखल केलेल्या अपीलाची नोटीस प्रत |
| १४ | उपजिल्हाधिकारी भुसंपादन यांनी दिलेला दाखला |
| १५. | विशेष भुमी संपादन अधिकारी यांनी दिलेला दाखला |

**१३.** त्याचप्रमाणे वादीने त्यांच्या युक्तिवादाच्या पुष्टयर्थ ***अजय मित्तल इंडस्ट्रीयल को.ऑपरेटिव्ह सोसायटी वि. राज पब्लीसिटी (२००४ (४) एम एच एल जे ३०५)*** व ***श्रीकांत संकनवार व इतर वि. कृष्णा नावकुडकर (२००३ (2) एम एच एल जे २०५)*** या न्यायनिर्णयांवर त्यांची भिस्त ठेवलेली आहे. तसेच लेखी युक्तिवाद देखील दाखल केलेला आहे.

**१४.** प्रतिवादी यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पुष्टयर्थ खालील कागदपत्रांवर त्यांची भिस्त ठेवलेली आहे.

| अ. क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता निरा–देवघर यांनी दिलेले निवाडा पत्र |
| २. | मंडल अधिकारी, फलटण यांनी दि.१५.०२.२०२४ रोजी दिलेला अहवाल |
| ३. | निरा–देवघर प्रकल्पाच्या जमीन संपादनाच्या आदेशाचा फेरफार क्र.६९१ |
| ४. | मौजे रायरी येथील इतर भाऊ यांची वारस म्हणून नोंद झालेले फेरफार |
| ५. | साक्षीदार गणेश तुकाराम डेरे यांनी दिलेले प्रतिज्ञापत्र |
| ६. | वादी व प्रतिवादी यांची नावे नमूद असलेली संकलन यादी |
| ७. | फेरफार क्र.६०४ ते ६८१ हे भोर पोलीस स्टेशन येथे जमा असल्याबाबतचा दाखला |
| ८. | रायरी गावातील फेरफार मिळून येत असल्याबाबत दैनिक सकाळ मध्ये आलेली बातमी |
| ९. | प्रतिवादी हे सरकारी योजनांचा लाभ घेत असल्याबाबतचा दाखला |
| १०. | संकलन क्षेत्राची निवाडा यादी |

**–का र ण मि मां सा –**

**१५.** प्रस्तुतचा अर्ज हा तुर्तातूर्त मनाई हुकूमाकरीता आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज निकाली करताना खालील गोष्टींची पडताळणी करणे आवश्यक आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाने अजय मित्तल (सुप्रा) मध्ये देखील तेच म्हटलेले आहे.

**अ.** सकृतदर्शनी केस.

**ब.** अपरिमित नुकसान.

**क.** सोयीचा समतोल.

**ड.** पक्षकारांचे वर्तन (Conduct of the parties)

**मुद्दा क्रमांक १ करीता :-**

**१६.** मुद्दा क्रमांक १ हा सकृतदर्शनी केस यासंबंधी आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये सकृतदर्शनी केस याबाबत व्याख्या दिलेली नाही. परंतु, मा.सर्वोच्च न्यायालय व मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी विविध न्यायनिवाडयांमध्ये सकृतदर्शनी केस निश्चित केलेली आहे. सकृतदर्शनी केस म्हणजे जर एखादया गोष्टीचे पुरावे दिले गेल्यास ती गोष्ट शाबीत होईल. थोडक्यात सकृतदर्शनी केस म्हणजे वादीच्या यशाची शाश्वती. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.५ते ७ यांच्या वडीलांना आंदन म्हणून देण्यात आली होती. सबब, त्यांच्या मृत्युनंतर वादी व प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचा दावा मिळकतीमध्ये हक्क व अधिकार आहे. याउलट प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. याउलट प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची एकत्रीत मिळकत असून केवळ गेणू डेरे हे एकत्रीत कुटुंबाचा कर्ता असल्यामुळे सुरुवातीस त्यांचे नाव दावा मिळकतीत लागलेले होते. परंतु प्रतिवादी यांचा देखील दावा मिळकतीत हक्क व अधिकार असून सामाईकात वहिवाट देखील आहे. सबब, उपरोक्त गोष्टी विचारात घेवून प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित करणे योग्य राहील.

**१७.** वादीच्या वादपत्रांचे व वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी यांच्या पूर्वहक्कदारांना आंदन म्हणून दिल्याचे वादीचे कथन आहे. सदर कथनांचा विचार करता वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता दावा मिळकत ही आंदन म्हणून दिल्याबाबत वादी यांनी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. याउलट वादीने दाखल केलेल्या फेरफाराचे अवलोकन करता फेरफार क्र.४४ अन्वये कब्जेवहिवाटीप्रमाणे वादीच्या पूर्वहक्कदारांचे नाव दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी नमूद झाल्याचे दिसून येते. वादीने ७/१२ व्यतिरिक्त मालकी हक्क दाखविणारा इतर कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार ७/१२ उतारा हा मालकीचा पुरावा नाही. मा. मुंबई

उच्च न्यायालयाने श्रीकांत (सुप्रा) मध्ये महसूल अभिलेख हा मालकीचा पुरावा होवू शकत नाही असे म्हटलेले आहे.

१८. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र हे निरा–देवघर प्रकल्पाकरीता संपादित करण्यात आलेले होते. सदर संपादनाबाबतच्या नोटीसा वादीने दाखल केलेल्या आहेत. सदर नोटीसींचे अवलोकन करता सदर नोटीसा या वादी यांचे पूर्वहक्कदार गेणु डेरे यांना दिल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे वादीने दाखल केलेल्या संपादन दाखल्यामध्ये देखील वादीचे पूर्वहक्कदार गेणू भागु डेरे यांच्या नावाची नोंद दिसून येते. परंतु प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता निरा– देवघर प्रकल्पाकरीता संपादित करण्यात आलेल्या जमीनींच्या खातेदार सदरी प्रतिवादी यांच्या नावाची नोंद देखील दिसून येते. त्याचप्रमाणे प्रतिवादींनी दाखल केलेल्या मंडल अधिकारी फलटण यांच्या अहवालाचे अवलोकन करता जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांच्या संकलन यादीत गेणु भागु डेरे व इतर ६ असे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे सदर संपादनाच्या बदल्यात उपविभागीय अधिकारी, फलटण यांनी मौजे ढवळेवाडी, ता.फलटण येथे जमीन दिलेली होती. सदर आदेशामध्ये देखील गेणु भागु डेरे वगैरे असा उल्लेख असल्याचे नमूद आहे. सदर बाब विचारात घेता गेणु भागु डेरे यांच्या व्यतिरीक्त इतर खातेदार देखील त्यामध्ये समाविष्ट असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सदर इतर खातेदार कोण आहेत याबाबत चौकशी चालू असल्याचे अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. सबब, सद्यस्थितीत केवळ संपादनाची नोटीस वादीच्या पूर्वहक्कदारांना आल्याने तसेच त्यांचे नाव ७/१२ सदरी असल्याने ते मालक असल्याचे गृहित धरणे योग्य ठरणार नाही.

१९. प्रतिवादी यांचे नाव फेरफार क्र.६४९ अन्वये नोंद झाल्याचे दोन्ही पक्षकारांमध्ये विवादीत नाही. त्याचबरोबर सदर फेरफार हा पोलीस चौकशी कामी जप्त

केल्याचे देखील विवादीत नाही. त्याबाबतीत हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यांचे अवलोकन करता सन १९९०-९१ पासून प्रतिवादींचे नाव ७/१२ उताऱ्यावर असल्याचे दिसून येते. आधी म्हटल्याप्रमाणे महसूल अभिलेख हा मालकीचा पुरावा नाही. परंतु विना आव्हानित जीर्ण महसूल अभिलेख विचारात घेवून पक्षकारांचा ताबा ठरविता येवू शकतो. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांचे नाव लागलेला फेरफार हा वादींनी सन २०२३ मध्ये प्रथमतः आव्हानित केल्याचे दिसून येते. सदर बाब ही अद्याप महसूल न्यायालयात प्रलंबित असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादींचे नाव बेकायदेशीर लागलेले आहे किंवा कसे ही बाब अद्याप निर्धारित होणे बाकी आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींचे नाव बेकायदेशीरपणे लागलेले आहे असे गृहित धरुन त्यांचा दावा मिळकतीत ताबा नाही असे म्हणणे न्यायोचित होणार नाही.

**२०.** वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचा एकत्रीतरित्या विचार करता वादी हेच दावा मिळकतीचे एकमेव व निर्विवाद मालक आहेत ही बाब दाखविण्याकरीता सकृतदर्शनी वादी यांनी कोणतेही ठोस व सबळ कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. याउलट वादी व प्रतिवादी यांची नावे सद्यस्थितीत महसूल अभिलेखी असल्याचे दिसून येते. उपरोक्त चर्चेचे एकत्रीतरित्या विवेचन करता वादीस प्रथमदर्शनी केस नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ व ३ करीता :-</u>**

**२१.** मुद्दा क्रमांक २ हा अपरिमित नुकसान व मुद्दा क्रमांक ३ हा सोयीचा समतोल याच्याशी निगडीत असल्यामुळे सदरचे दोन्ही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न आहेत. सबब, पुराव्याची पुनरावृत्ती टाळणेकरीता मी उपरोक्त दोन्ही मुद्दे एकत्रीत चर्चित आहेत.

**२२.** कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार वादीने केवळ सकृतदर्शनी केस शाबीत करणे योग्य नाही. त्याचबरोबर त्यांनी तुर्तातूर्त मनाई न दिल्यास त्यांना अपरिमित

असे नुकसान होवू शकते तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने आहे हे शाबीत करणे आवश्यक आहे.

**२३.** वादीने प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ हे त्यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत असल्याचे म्हटलेले आहे. वादीने त्यांचा कब्जा दाखविण्याकरीता साक्षीदारांची शपथपत्रे याकामी दाखल केलेली आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी देखील साक्षीदाराचे शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर शपथपत्रे ही परस्परविरोधी असल्याचे दिसून येते. त्यामुळे केवळ शपथपत्रांवरुन ताबा ठरविणे योग्य ठरणार नाही. त्याचप्रमाणे आधी म्हटल्याप्रमाणे महसूल अभिलेख हा ताबा ठरविताना उपयोगी पडू शकतो. प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादी या दोघांची नावे ७/१२ सदरी दाखल आहेत. त्यामुळे सकृतदर्शनी केवळ वादीचा ताबा आहे असे म्हणणे न्यायोचित होणार नाही.

**२४.** त्याचप्रमाणे प्रतिवादी हे महसूल नोंदीच्या आधारे दावा मिळकतीत त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे वादीचे कथन आहे. त्या अनुषंगाने हे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी गणेश तुकाराम डेरे यांनी स्वतः व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या तर्फे शपथेवर कथन करुन दावा मिळकती हस्तांतरीत करणार नसल्याचे स्पष्टपणे म्हटलेले आहे. त्यामुळे दावा मिळकती हस्तांतरित करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. त्यामुळे केवळ वादीचे तोंडी शब्दावर विसंबून प्रतिवादी हे दावा मिळकत विक्री करीत असल्याचा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे सोईचा समतोल हा देखील वादीच्या बाजूने नाही. उपरोक्त चर्चेचा विचार करता मी मुद्दा क्रमांक २ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीता –</u>**

**२५.** मुद्दा क्रमांक १ ते ३ चे विवेचनावरुन वादीस प्रथमदर्शनी केस नाही, तसेच सोयीचा समतोल व अपरिमित नुकसान वादीचे होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कर्षाकरीता मी, पुढील आदेश पारीत करतो.

**– आ दे श –**

प्रस्तुत अर्ज (निशाणी ५) नामंजूर करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2025.11.10 15:52:50 +0530

**ठिकाणः– भोर .** **( एस.डी.शिरसाट )**
**दिनांकः– ०७.११.२०२५.** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**भोर.**